**महाराष्ट्र शासन**

संकीर्ण-
क्र. २०१५/प्र.क्र. ७०० /जल-१
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १० एप्रिल ,२०१५.

**प्रति,**

**सर्व जिल्हाधिकारी.**
**मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण),पुणे.**
**मुख्य अभियंता, वि.स.सिं.वि.का.,नागपूर.**
**सर्व अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण).**
**सर्व कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण).**
**सर्व जिल्हा अधीक्षक, कृषि अधिकारी.**

**विषय : जलसंधारण विभागामार्फत जलसंधारणाचे विविध उपचार उदा. सिमेंट नालाबांध व अन्य बांधाची बांधकामे करताना वापरावयाच्या संधनकाबाबत**

जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या मापदंडा विषयक तसेच योजनांच्या इतर मुद्दया संदर्भात मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. ७ एप्रिल, २०१५ रोजी बैठक झाली. या बैठकीत जलसंधारण विभागाच्या कामांसाठी संधानकाचा ग्रेड निश्चित करण्याबाबतच्या विषयावर चर्चा झाली. त्यावेळी जलसंधारण विभागामार्फत बांधण्यात येणाऱ्या बंधाऱ्यांच्या / योजनांच्या इतर बांधकामांसाठी संधानकासाठी M-१५ ग्रेडचा वापर करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत जून २०१५ पर्यंत पूर्ण करावयाच्या कामांसंदर्भात काढण्यात आलेल्या निविदांमध्ये M-१० संधानकाचा वापर करण्याचे प्रस्तावित केलेले असल्यास ही बांधकामे M-१५ संधानकात होण्याकरिता प्रस्तुत निविदा मंजूर करण्यापूर्वी निविदेत Cement Variation Clause चा अंतर्भाव करावा. व त्यानुसार फरकाची रक्कम नियमानुसार देण्यात यावी असाही निर्णय घेण्यात आलेला आहे. याबाबत दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी सचिव (जलसंधारण) यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या घेतलेल्या व्हिडिओ कॉन्फरन्स मध्ये देखील माहिती देण्यात आलेली आहे. कृपया त्यानुसार कार्यवाही करावी.

**(वि.सि.वखारे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत अग्रेषित :-**

१. सर्व विभागीय आयुक्त
२. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य
३. संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन
४. सर्व विभागीय कृषि सह-संचालक